## ठाणे जिल्ह्याचा मैलागाळ व्यवस्थापन आराखडा -२०२२-२३

१. **प्रास्ताविक:** ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील कुटुंबांची संख्या २.५६ लक्ष एवढी असून त्यापैकी २.५६ लक्ष एवढया कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालये आहेत. जिल्ह्यात ५०० सार्वजनिक शौचालये आहेत. जिल्ह्यातील कल्याण, अंबरनाथ आणि भिवंडी हे तालुके मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झालेले तालुके आहेत. तसेच जिल्ह्यात सहा महानगरपालिका असून त्यापैकी कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर आणि उल्हासनगर या महानगरपालिका अंबरनाथ आणि कुळगांव बदलापूर या नगरपालिका ग्रामीण क्षेत्राला संलग्न असून त्यांच्याकडे मैलागाळ व्यवस्थापन प्रकल्प कार्यान्वित आहेत. त्यांच्या मदतीने, तसेच पाच तालुक्यांत प्रत्येकी एक याप्रमाणे पाच प्रकल्प हाती घेऊन आणि ५०० पेक्षा कमी लोकसंख्येच्या महसूली गावांना चर तंत्रज्ञानाचा वापर करुन तयार केलेले मैलागाळ व्यवस्थापन प्रकल्प उभे करुन जिल्ह्यातील मैलागाळाचे व्यवस्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

२. **जिल्ह्याची प्राथमिक माहिती-** जिल्ह्याची प्राथमिक माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ) जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या: ५

आ) जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची संख्या: ४३१

इ) जिल्ह्यातील गावांची संख्या: ७९२

ई) जिल्ह्यातील ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या महसूली गावांची: १४५

उ) जिल्हयातील एकूण ग्रामीण शौचालयांची संख्या- २.५६ लक्ष

३. **जिल्ह्यातील मैलागाळ व्यवस्थापन आराखडा २०२२-२३-** ठाणे जिल्ह्याचा या आर्थिक वर्षाचा मैलागाळ व्यवस्थापन आराखडा खालील तीन प्रकारे करण्यात येत आहे.

अ) **५०० पेक्षा कमी लोकसंख्येच्या महसूली गावांना चर तंत्रज्ञानाचा वापर-** जिल्ह्यातील ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या महसूली गावांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) अंबरनाथ - ११
२) कल्याण - २१
३) भिवंडी - ३१
४) मुरबाड - ४४
५) शहापूर - ३८
--------------------------
**एकूण = १४५**

वरील प्रमाणे तालुकानिहाय ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या महसूली गावांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे कोष्टकात दिली आहे.

| अ. क्र. | तालुका | ग्रामपंचायतींची संख्या | गावांची संख्या | उपलब्ध निधी (रु. लाख) | नियमांनुसार जागा उपलब्धता (आहे/नाही) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ | ८ | ११ | ७.५४ | |
| २ | भिवंडी | २६ | ३१ | २४.३२ | |
| ३ | कल्याण | १५ | २१ | १४.५५ | |
| ४ | मुरबाड | ३० | ४४ | ३२.१० | |
| ५ | शहापुर | २८ | ३८ | २७.२७ | |
| | **एकुण** | **१०७** | **१४५** | **१०५.७७** | |

वरीलप्रमाणे ज्या गावांमध्ये जागा उपलब्ध आहेत, त्या गावांमध्ये टाईप अंदाजपत्रकाच्या व तंत्राच्या आधारे चर बांधणीची (Deep Trenches) ची कामे माहे ३१ मार्च, २०२३ अखेर पूर्ण करुन घेण्याचे नियोजित आहे.

**ब) मैलागाळ व्यवस्थापन समूह प्रकल्प (Feacal Sludge Management Cluster)-**

सन २०२२-२३ च्या मंजूर आराखड्यानुसार प्रत्येक तालुक्यात एक मैलागाळ व्यवस्थापन समूह प्रकल्प (Feacal Sludge Management Cluster) उभारण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

समूह प्रकल्पाची वैशिष्ट्ये: १) किमान ५० हजार ते ६० हजार लोकसंख्येसाठी एक प्रकल्प. २) एका मोठ्या लोकसंख्येच्या नजीकच्या १० ते १५ गावांचा (साधारणत: १० ते १५ कि.मी. अंतर) एक समूह.

त्यानुसार जिल्ह्यातील तालुकानिहाय समूह प्रकल्प खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तालुका | समूह प्रकल्पाचे नाव व ठिकाण | ग्रामपंचायतीचे नांव | सहभागी गावांची नावे | लोकसंख्या (सध्याची) | प्रकल्पाची किंमत (रु. लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ | | | | | |
| २ | भिवंडी | | | | | |
| ३ | कल्याण | | | | | |
| ४ | मुरबाड | | | | | |
| ५ | शहापुर | | | | | |

क) **मैलागाळ व्यवस्थापनासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे सहकार्य:** जिल्ह्यात कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर आणि उल्हासनगर या महानगरपालिका अंबरनाथ आणि कुळगांव u बदलापूर या नगरपालिका या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे मैलागाळ व्यवस्थापनासाठी प्रकल्प असल्याने त्यांच्याकडील उपलब्ध सुविधांचा वापर करण्यासाठी दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार करुन ग्रामीण संलग्न गावांसाठी सदर प्रकल्प व सुविधा वापरण्याचे प्रस्तावित आहे. त्याचा तपशिल तालुकानिहाय खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव | प्रकल्पाचे नाव / ठिकाण | संलग्न गावांची नावे | कंत्राटदार / वाहतूक यंत्रणा | संपर्क दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | कुळगाव बदलापुर नगरपरिषद | रमेशवाडी | | MH-०४-KR-३८८९ | ९३२६८४४०९७ |
| २. | भिवंडी निजामपुर मनपा | काटई-१ | | संदीप पटणावर | ९८२३०३७८२८ |
| ३. | भिवंडी निजामपुर मनपा | बकरा बझार | | विनोद मते | ९८७२९६३८० |
| ४. | भिवंडी निजामपुर मनपा | ईदगाह स्लाटर हाऊस कारीवली | | हरेश म्हात्रे | ७७९८७७७००० |
| ५. | भिवंडी निजामपुर मनपा | भादवड | | सचिन नाईक | ९९२२२९२२०० |
| ६. | भिवंडी निजामपुर मनपा | स्टेफिंग गार्डन | | सचिन नाईक | ९९२२२९२२०० |

**जाहिरातीचा प्रारुप**

**जिल्हा परिषद, ठाणे**

**जिल्हा पाणी व स्वच्छता विभाग**

**स्वारस्याची अभिव्यक्ती**

**Expression of Interest Notice**

*************************************************************

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत ठाणे जिल्ह्यात **मैला गाळ व्यवस्थापन (Faecal Sludge Management)** प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी पात्र व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्थांकडून अर्ज मागविण्यासाठी आवेदन

*************************************************************

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत ठाणे जिल्ह्यात, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात **मैला गाळ व्यवस्थापन (Faecal Sludge Management)** कार्यान्वित करण्यासाठी, प्रकल्पाचे सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करुन सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करणे, कामाचे संपूर्ण पर्यवेक्षण करणे, तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे या कामासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञ व अनुभवी संस्थांकडून **स्वारस्याची अभिव्यक्ती** (Expression of Interest) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या संदर्भातील सविस्तर तपशिल ठाणे जिल्हा परिषदेच्या **zpthane.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर देण्यात आलेला आहे.

सही /-

मनुज जिंदल [भा.प्र.से.]

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद ठाणे